**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण आस्थापनेवरील मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी,सहाय्यक,वरिष्ठ लिपीक या पदांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणेबाबत...**

**आदेश क्र.प्राधि/सुधा.वे.श्रे./२०२१/ ४७६ /प्र.१०**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**मुंबई-४००५१.**
**दिनांक -** 05/02/2021

**संदर्भ:-** १) वित्त विभाग,महाराष्ट्र शासन यांची अधिसुचना दि.२२/०४/२००९
२) शासन निर्णय क्र.वेपूर-१२१२/प्र.क्र.३१/सेवा-९ दि.११/०२/२०१३
३)वेतन सुधारणा समितीच्या दि.०४/१०/२०१६,दि.२०/३/१७,दि.५/०६/१८, दि.१०/०८/१८, दि.२१/०५/१९, दि.२१/०५/२०१९ दि.३०/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त
४) समिती अध्यक्ष तथा मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ यांची टिपणी क्र.१२८ दि.१४/०१/२०२१

**आदेश**

सहाव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी मधील सुधारणाबाबत म्हाडा आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांना सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर राहीलेल्या वेतन विषयक त्रुटींबाबत कर्मचारी संघटना यांचेकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्राधिकरणाचे आदेश क्र.प्राधि /वे.प.व.सु.स.म्हाडा/२०१/३३१०, दि.११.०७.२०१६ अन्वये मुख्य अधिकारी./मुंबई मंडळ यांचे अध्यक्षतेखाली वेतन त्रुटी निवारण व सुधारणा समिती गठीत करण्यात आली. मुख्य अधिकारी./मुंबई मंडळ तथा समिती अध्यक्ष यांनी दि.१४/०१/२०२१ च्या टिपणीव्दारे मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक, वरिष्ठ लिपीक या संवर्गास वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करुन पुढील कार्यवाही सचिव/प्रा. यांना करण्याबाबत वेतन सुधारणा समितीच्या दि.२१.०५.२०१९ व ३१/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक, वरिष्ठ लिपीक वेतन बँड सुधारण्याच्या प्रस्तावास मा.उपाध्यक्ष/प्रा. यांनी मान्यता दिली आहे.

म्हाडातील वेतन त्रुटी निवारण समितीने शिफारस केल्यानुसार, मिळकत व्यवस्थापक/प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक, वरिष्ठ लिपीक संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासन निर्णय क्र.वेपूर-१२१२/प्र.क्र.३१/सेवा-९ दि.११/०२/२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार खालील दर्शविल्याप्रमाण सुधारित वेतनबँड व ग्रेड पे **दि.०१/०१/२००६** पासून उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचे मान्यतेने लागू करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | विद्यमान वेतनबँड व ग्रेड पे (सहाव्या वेतन आयोगानुसार) | | सुधारित वेतनबँड व ग्रेड पे (सहाव्या वेतन आयोगानुसार) | |
|---|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड | ग्रेड पे | वेतन बँड | ग्रेड पे |
| १ | मिळकत व्यवस्थापक/ प्रशासकीय अधिकारी | ९३००-३४८०० | ४४०० | ९३००-३४८०० | ५४०० |
| २ | सहाय्यक | ९३००-३४८०० | ४२०० | ९३००-३४८०० | ४३०० |
| ३ | वरिष्ठ लिपीक | ५२००-२०२०० | २४०० | ५२००-२०२०० | २८०० |

१/- वरीलप्रमाणे वेतनबँड बदलामुळे संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यात कोणताही बदल होणार नाही.

२/- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील उक्त संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची दि.०१/०१/२००६ ते ३१/०१/२०१३ या कालावधीतील अनुज्ञेय वेतनवाढी काल्पनिकरित्या मंजूर करण्यात येऊन दि.०१/०२/२०१३ ते ३१/१२/२०१८(दोन्ही दिवस धरुन) या कालावधीतील वेतनाच्या अनुज्ञेय थकबाकीची रक्कम आर्थिक वर्ष सन २०२१-२२ पासून पुढील पाच वर्षात समान पाच हप्त्यात अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा करण्यात यावी. ही रक्कम जमा केलेल्या दिनांकापासून २ वर्ष काढून घेता येणार नाही.तसेच **दि.०१/०१/२०१९** पासून वेतनवाढीतील फरक रोखीने अदा करण्यात यावा.

३/- दि.०१/०२/२०१३ ते २८/०२/२०२१(दोन्ही दिवस धरुन) या कालावधीत सेवेतून निवृत्त झालेले, सेवेत असताना मृत्यू पावलेले, स्वेच्छानिवृत्त झालेले, सेवेचा राजीनामा दिलेले, प्राधिकरणाचे अधिकारी /कर्मचाऱ्यांना सदर थकबाकीची रक्कम रोखीने अदा करण्यात यावी.

४/- प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यानी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत विकल्प द्यावयाचा आहे. एकदा दिलेला विकल्प हा अंतिमस्वरुपाचा राहील व त्यात नंतर बदल करता येणार नाही. प्रादेशिक मंडळातील अधिकाऱ्यांनी सुधारित वेतन संरचनेतील वेतन निश्चितीचा विकल्प मुख्य लेखाधिकारी यांच्याकडे द्यावयाचा आहे. प्राधिकरणात कार्यरत अधिकारी व कर्मचारी वित्त नियंत्रक प्राधिकरण यांच्याकडे विकल्प सादर करतील.

५/- पूर्व तपासणी अभावी काही थकबाकी चुकीने परिगणित होण्याची शक्यता आहे आणि ती अतिप्रदान म्हणून ठरल्यास त्याची नंतर वसुली करावी लागेल.यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याला सुधारित वेतन संरचनेत वेतननिश्चिती करण्यापूर्वी असे लेखी वचनपत्र द्यावे लागेल की, वेतनाच्या निश्चितीमुळे काही जास्त रक्कम अदा झाली असे आढळून आल्यास ती भविष्यात देय होणाऱ्या रकमेशी समायोजित करुन अथवा इतर प्रकारे प्राधिकरणास परत करतील.

६/- वेतन सुधारणेपोटी येणारा खर्च प्राधिकरणाच्या निधीतून भागविला जाईल.

**मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण**
**यांचे मान्यतेने**

(राजकुमार सागर)
सचिव/प्राधिकरण

**<u>प्रत सस्नेह अग्रेषितः</u>**

१.मुख्य अभियंता / प्रा. (१/ २/ ३)

२.वित्त नियंत्रक / प्रा.

३.विधी सल्लागार / प्रा.

४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी / प्रा.

५.मुख्य अधिकारी / मुं.गृ.नि.व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./ कोंकण / पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती मंडळ

६.सहमुख्य अधिकारी / मुंबई मंडळ / मु.इ.दु.व पु.मं.

७. उपमुख्य अभियंता, [संगणक कक्ष]/प्रा./ द.व गु.नि./प्रा./ जेएनएनयुआरएम/प्रा./नियोजन / एस.आर.डी./ स्थापत्य / मुं.मं./ परिमंडळ-१, २, ३, ४ / दु.व पु.मंडळ

८. वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार /मुं.मं.

९. कार्यकारी अभियंता, (विद्युत)/ [दुरुस्ती]/ (वांद्रे]/[घाटकोपर ]/(एस.आर.डी.-१, २, ३)/(प्रनिस) / मुं.मं. अतिक्रमण निर्मुलन कक्ष/मुंबई मंडळ

१०.कार्यकारी अभियंता १, २, ३ / प्रा. / विद्युत / प्रा.

११. कार्यकारी अभियंता (पूर्व) (पश्चिम) (शहर)/ ग.व.सु.मंडळ

१२. मुख्य लेखाधिकारी / मुं.गृ.व क्षे.वि.मं./ मुं.इ.दु.पु.मं./ मुं.झो.सु.मं.

१३. उपमुख्य अधिकारी [मि.व्य.१/२] डब्ल्यू / पणन कक्ष /मुंबई मंडळ
पु.गा./सं.गा./ मुं.इ.दु.व पु.मंडळ

१४. लेखाधिकारी/प्रा. डब्ल्यु./मुं.मं.

१५. सहाय्यक लेखाधिकारी, १, २ ३ व ४ /मुं.इ.दु.व पु.मंडळ

१६. मुख्य लेखा अधिकारी / कोंकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती मंडळ

१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी/प्रा.

१८. संचालक/पी.डी.सी. पुणे.

१९. कार्यकारी अभियंता / ए, बी, सी-१, सी-२, सी-३, डी-१, डी-२, ई-१, ई-२,फ/ग दक्षिण, फ (उत्तर) ग (उत्तर), मुं.इ.दु.व पु.मंडळ / एसआरडी -४/मुंमं.

२०. सहव्यवस्थापकीय संचालक / शि.पु.प्र.लि.

२१.प्रशासकीय अधिकारी /झोपडपट्टी पुर्नविकास प्राधिकरण

प्रत: प्रशासकीय अधिकारी/प्रा./ मुं.मं./ दुवपुमं./ मुं.झो.सु.मं/. कोंकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर/ अमरावती

**<u>प्रत माहितीसाठी: -</u>**

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक.

प्रत: अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना

प्रत: प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना

प्रत: अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

प्रत: लेखापाल / प्रा. ,

प्रत: प्रशासन - ७,११,१४,१७.